ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ४ मे, १९६० | अंक १८


## विविध माहिती

**दोन कादंबऱ्यांना बंदी** — अमेरिकेंतील फ्लॉरिडामधील मिआमी ह्या गांवीं दोन कादंबऱ्यांना बंदी करण्यांत आली आहे. ह्या कादंबऱ्यांतून अश्लील मजकूर असल्यामुळें त्या दुय्यम शाळांतील वाचनालयांतून ठेवूं नयेत अशी मागणी पालकांतर्फे करण्यांत आली होती, 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' व '१९८४' ह्या त्या दोन कादंबऱ्या असून त्या अनुक्रमें अल्डस हक्स्ले व ऑरवेल ह्या लेखकांनीं लिहिलेल्या आहेत.

**नर्मदा खोरें योजना**—नर्मदा खोरें योजनेचें काम पाहण्यासाठीं एका सुपरिंटेंडिंग एंजिनिअरची लवकरच नेमणूक होणार आहे. ह्या योजनेला मंजुरी मिळाली असून काम लवकरच चालू होईल. अहमदाबाद विभागांत ६०,००० एकर जमिनींत बंडिंगचीं कामें हातीं घेण्यांत येणार आहेत. ह्या कामामुळें अन्नधान्याच्या उत्पादनांत चांगली वाढ होईल.

**यंत्रतज्ज्ञांचा भारताचा दौरा**—रशिआच्या परदेशीय व्यापारखात्याचे मंत्री २० यंत्रतज्ज्ञ बरोबर घेऊन भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. भारताला लागणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या औद्योगिक यंत्रसामुग्रीविषयीं ते संबंधितांशीं चर्चा करतील. त्याचप्रमाणें रशिआकडून कोणती यंत्रसामग्री गरजूंना घेतां येईल त्याचाहि अभ्यास करतील.

**लेखकांची परिषद्**—लाहोर येथें गेल्या महिन्याच्या २८ तारखेला पाकिस्तान व भारत ह्या देशांमधील लेखकांची परिषद भरविण्यांत आली होती. ही परिषद एका पंजाबी साहित्यसंघटनेमार्फत भरविण्यांत येत असून भारताची फाळणी झाल्यावर भरणारी अशा प्रकारची ही पहिलीच परिषद् आहे. उभयतां देशांच्या सामान्य वाङ्मयीन व सांस्कृतिक वारसा राखण्याचा परिषदेचा उद्देश आहे.

**विनातिकिट प्रवाशांकडून उत्पन्न**—मुंबईतील पश्चिम रेल्वे मार्गावर वाहतूक करणाऱ्या गाड्यांतून किती तरी उतारू विनातिकिट प्रवास करीत असतात. लोकल गाड्यांतून अशा रीतीनें प्रवास करणाऱ्या उतारूंपासून तिकिट-तपासनीस रोज सरासरी १,००० रुपये वसूल करतात.

**भारताला अधिक निर्यात करा**—ऑस्ट्रिआच्या अर्थमंत्र्यांनीं भारताचा दौरा केल्यानंतर अशी सूचना केली आहे कीं, भारताला ऑस्ट्रिआकडून करण्यांत येणाऱ्या निर्यातींत वाढ करण्यांत यावी. ह्या बाबतींत ऑस्ट्रिआनें केलेल्या सूचनांचा तपशीलवार विचार करण्यासाठीं भारताचें एक प्रतिनिधीमंडळ लवकरच ऑस्ट्रिआला जाणार आहे.

**खंबायतच्या आखाताच्या भागांतील तेल**—रशिआच्या भूगर्भखात्याच्या मंत्र्यांनीं दिलेली एक मुलाखत रशिआमधील एका वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आली आहे. खंबायत भागांत भारत सरकार दरसाल १० लाख टन तेल शुद्ध करणारा एक कारखाना उभारणार आहे, अशी माहिती मुलाखतींत देण्यांत आली आहे. भारतांत आणखी तेल सांपडण्याची शक्यताहि मुलाखतींत व्यक्त करण्यांत आली आहे.

**हैदराबाद येथें प्राणिसंग्रहालय**—हैदराबाद येथें लवकरच एक मोठें प्राणिसंग्रहालय स्थापन करण्यांत येणार आहे. प्राणिसंग्रहालयासाठीं ३०० एकर रमणीय जागा निवडण्यांत आली आहे. प्राणिसंग्रहालयाला एखाद्या सहलीच्या जागेचें स्वरूप देण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं ३० लाख रुपये लागतील.

**अणुशक्तीच्या विकासाला मदत**— अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाच्या कामांत रशिआ भारताला साह्य करणार आहे. भारताच्या अणुशक्ति-मंडळाचे अध्यक्ष श्री. भाभा ह्यांच्या नेतृत्वाखालीं भारताचें एक प्रतिनिधिमंडळ रशिआला भेट देणार आहे. अणुशक्तीवर चालणारीं छोटीं वीज-केंद्रें उभारण्याच्या कामीं मदत घेण्याचा भारताचा विचार आहे.

**सहकारी जलविद्युत्-केंद्र**—भंडारा-रांधरा जलविद्युत्-केंद्राला मंजुरी देण्याची विनंति कोपरगांव तालुका काँग्रेस कमिटीतर्फे मुंबई सरकारला करण्यांत आली आहे. संकल्पित वीजकेंद्र सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार आहे. तालुक्यांतील शेती व उद्योगधंदे ह्यांच्या विकासासाठीं वाढता वीजपुरवठा होण्याची फार गरज आहे.

**महात्माजींच्या पत्रांची जमवाजमव**—महात्मा गांधींनीं लिहिलेलीं पत्रें गोळा करण्यासाठीं गांधी-स्मारक-निधीतर्फे लोकांना विनंती करण्यांत आली होती. विनंतीला अनुसरून देशांतील व देशाबाहेरच्या अनेक लोकांनीं महात्माजींचीं पत्रें व हस्तलिखितें पाठविलीं. त्यांची संख्या आतां ५,००० पर्यंत पोंचली आहे. पत्रांच्या मालकांना त्यांचीं छायाचित्रें पाठविण्यांत येणार आहेत.

**कागदाचें उत्पादन**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत भारत कागदाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल अशी माहिती लोकसभेंत उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं सांगितली. तथापि, कांहीं विशिष्ट प्रकारचे कागद कांहीं प्रमाणांत नंतरहि आयात करावे लागतील, असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला.

## विश्रांतिस्थानांचा विकास

मुंबई सरकारनें अंबोली येथें आणखी एक उन्हाळ्याचें विश्रांतिस्थान स्थापन केलें आहे. उन्हाळ्याच्या चालू हंगामांत ह्या ठिकाणीं ७ कुटुंबांची राहण्याची सोय करण्यांत आली असून त्याशिवाय आणखी कांहीं बिन्हाडांच्या जागा बांधण्याचें काम चालू आहे. अंबोली हें थंड हवेचें ठिकाण समुद्रसपाटीपासून ३,४०० फूट उंच असून सावंतवाडीपासून १८ मैल व बेळगांवपासून ४० मैलांवर आहे. राहण्याची जागा राखून ठेवण्यासाठी करावयाचे अर्ज रत्नागिरी येथें करतां येतात अगर मुंबईला सुपरिंटेंडिंग एंजिनिअरच्या कचेरींत करतां येतात. मुंबई सरकारच्या धोरणास अनुसरून आणखीहि कांहीं विश्रांतिस्थानांची स्थापना करण्यांत येत असून जुन्या विश्रांतिस्थानांचा विस्तारहि करण्यांत येत आहे. सुप्रसिद्ध अजंठा लेण्याच्या पायथ्याशी प्रवाशांची उतरण्याची सोय करण्यांत येत आहे. ह्या ठिकाणीं त्यांच्या जेवणाखाणाचीहि सोय होत आहे. मुंबईजवळील वज्रेश्वरी येथील उन्हाळी कुंडें प्रसिद्ध आहेत. उष्णकुंडांत स्नान करून आरोग्य प्राप्त करून घेण्यासाठी येथेंहि नेहमीं लोक येत असतात. वज्रेश्वरी येथें सहा कुटुंबांची राहण्याची सोय करण्यासाठी सध्यां बांधकाम चालू आहे. माथेरान येथील विश्रांतिस्थानासाठी सरकारनें ह्यापूर्वी एक इमारत घेतली होती. आतां आणखी एक इमारत घेण्यांत आली आहे. कोल्हापूरपासून १२ मैलांवर असलेल्या पन्हाळा येथील विश्रांतिस्थानाचा विस्तार करण्यांत येत आहे. तेथें आणखी तीन कुटुंबांची राहण्याची सोय करण्यांत येत आहे. महाराष्ट्रांत अशा प्रकारचीं ११ विश्रांतिस्थानें असून ज्यांचें उत्पन्न दरमहा ५०० रुपयांपेक्षा कमी आहे, अशांनाच त्यांचा लाभ घेतां येतो.

---

## १९५८ मधील जनरल विम्याचें काम

भारतीय विमा कंपन्यांना जनरल विम्याच्या हप्त्यांचें निव्वळ उत्पन्न १९५७ मधील १०.९६ कोटी रुपयांवरून वाढून १९५८ मध्यें १२.९६ कोटी रु. झालें. त्यांपैकी ४.३६ कोटी रु. आगीच्या विम्याच्या उत्पन्नापासून, २.५९ कोटी रुपये सागरी विम्याच्या उत्पन्नापासून आणि ६.०१ कोटी रुपये संकीर्ण विम्याच्या उत्पन्नापासून मिळालें. परदेशीय विमा कंपन्यांना मिळालेल्या उत्पन्नाचे हेच आंकडे अनुक्रमें ३.२२ कोटी रुपये, १.७२ कोटी रुपये व २.२५ कोटी रुपये असें असून तें मिळून १९५८ मध्यें त्यांना एकूण ७.१९ कोटी रुपये मिळाले.

भारतीय विमा कंपन्यांनीं परदेशांत केलेल्या जनरल विम्याच्या हप्त्यांचें निव्वळ उत्पन्नहि १९५७ मधीलपेक्षा १९५८ मध्यें जास्त, म्हणजे १२.०२ कोटी रुपये मिळाले. त्यांपैकी आगीच्या विम्याच्या उत्पन्नापासून ६.६५ कोटी रुपये, सागरी विम्याच्या उत्पन्नापासून २.३६ कोटी रुपये, संकीर्ण विम्याच्या उत्पन्नापासून ३.०१ कोटी रुपये मिळाले. भारतांतील जनरल विम्याच्या कामाचा निर्देशांक १९५८ मध्यें ६.१ टक्क्यानें वाढला. १९५७ मध्यें तो ०.५ टक्क्यानें वाढला होता.

---

## पांच व दहा हजार रुपयांच्या नवीन नोटा

रिझर्व्ह बँकेचे सध्यांचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अयंगार, ह्यांची सही असलेल्या ५,००० रुपयांच्या व १०,००० रुपयांच्या रिझर्व्ह बँक चलनी नोटा लवकरच काढण्यांत येतील. श्री. बी. रामराव ह्यांच्या सहीच्या सध्यांच्या नोटा चलनांत राहतीलच.

**भारत-रशिआ सागरी वाहतूक**—भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान सागरी वाहतूक चालू करण्याचा करार झालेला आहे. कराराप्रमाणें 'विश्वप्रभा' व 'विश्वउषा' ह्या नांवाच्या दोन बोटी मालाची वाहतूक करण्यासाठीं वापरण्यांत येतील. पहिली बोट ८,५०० टन वजनाची असून ती युगोस्लाव्हिआंत बांधण्यांत आली आहे. 'विश्वप्रभा' आपल्या पहिल्या प्रवासासाठीं निघाली आहे. ती ओडेसा बंदराला जाईल.

**गृहशास्त्राचे शिक्षक**—दिल्ली येथें गृहशास्त्रांतील तज्ज्ञांची एक परिषद् तीन दिवस भरली होती. ह्या परिषदेनें अशी सूचना केली आहे की, विविध उद्देशीय शाळांसाठी व शिक्षणविस्तार योजनांसाठी गृहशास्त्राचें शिक्षण घेतलेले शिक्षक तयार करावे व शिक्षक शिकवून तयार करण्यासाठी खास उपायहि योजण्यांत यावेत.

**वनस्पति तुपासाठी रंग**—शुद्ध तुपांत वनस्पति तुपाची भेसळ करणें अशक्य व्हावें म्हणून वनस्पति तुपांत आरोग्याला हानिकारक नसणारा एखादा रंग मिसळण्याची सूचना करण्यांत आली आहे. अशा प्रकारचा योग्य रंग शोधून काढण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आतां तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्याचा विचार चालविला आहे.

**तागाच्या वस्तूंचें उत्पादन**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत तागाच्या वस्तूंच्या उत्पादनाबद्दल जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें, त्यापेक्षाहि अधिक उत्पादन होण्याची शक्यता दिसत आहे. ११ लाख टन वजनाचा माल उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. प्रत्यक्ष उत्पादन मात्र ११॥ लाख टन वजनाच्या मालापर्यंत होईल, अशी अपेक्षा आहे.

**दारूबंदीच्या यशाचें मोजमाप**—सुरत जिल्हा काँग्रेस कमिटीनें दारूबंदीच्या परिणामाबद्दल माहिती पुरविण्याची विनंती लोकांना केली आहे. दारूबंदीच्या यशापयशाचें मोजमाप करतां यावें म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे. लोकांकडून आलेल्या माहितीचें मूल्यमापन करण्यासाठी आठ जणांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे. दारूबंदीची पाहणी करणारी ही पहिलीच काँग्रेस कमिटी आहे.

**अमेरिकेचा नवा अग्निबाण**—अमेरिकेच्या विमानदलातर्फे एका नव्या अग्निबाणाची चांचणी करण्यांत आली. हा अग्निबाण एका खंडांतून दुसऱ्या खंडांत जाऊं शकणारा असून ५,००० मैलांच्या आंतील लक्ष्यावर तो मारा करूं शकेल. त्याची लांबी ५८ फूट आहे. चांचणीनंतर काढण्यांत आलेल्या पत्रकांत अग्निबाण यशस्वी ठरल्याचें म्हटलें आहे.

**अहमदाबाद-दिल्ली जनता गाडी**—सध्या अहमदाबादपासून दिल्लीपर्यंतचा प्रवास करणारी जनता एक्सप्रेस आठवड्यांतून तीनदां सोडण्यांत येतें. येत्या ऑक्टोबर महिन्यापासून ही गाडी रोज सोडण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें ता. १ मे पासून बलसाड ते अहमदाबाद नवी एक्सप्रेस गाडीहि सोडण्यांत येणार आहे.

**तांदुळासंबंधीं संशोधन-संस्था**—तांदुळासंबंधी संशोधन करणारी एक आंतरराष्ट्रीय संशोधन-संस्था स्थापन करण्यासाठी अमेरिकेमधील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें ६९ लाख डॉलर्सची देणगी जाहीर केली आहे. ह्या संशोधनकेंद्राला रॉकफेलर फौंडेशन व फिलिपाइन्सचें सरकार ह्यांचीहि मदत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ४ मे, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रोजगारावर भर

भारतीय लोकसभेच्या एस्टिमेट्स कमिटीनें आपला ८८ वा अहवाल लोकसभेला सादर केला आहे. त्या अहवालांत सरकारला अनेक सूचना करण्यांत आल्या आहेत. पण देशांतील वाढती लोकसंख्या व बेकारी ह्या विषयांबद्दल करण्यांत आलेल्या सूचना विशेष महत्त्वाच्या आहेत. अहवालांत असें सुचविण्यांत आलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सरकारनें बेकार लोकांना रोजगार पुरविण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरवावें. त्याचप्रमाणें, कुटुंबनियोजनाची कल्पना लोकांना प्रिय व्हावी म्हणूनहि उपाय योजण्यांत यावेत. विशेषतः कमी उत्पन्न मिळविणारा जो कामगारवर्ग आहे, त्याच्यांत कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यांत यावा. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतांत सुमारें ७५ लाख लोक बेकार असतील असा अंदाज अहवालांत करण्यांत आला आहे. कदाचित् बेकारांची ही संख्या ८० लाखांपर्यंतहि असण्याचा संभव आहे. ह्या कालांत काम करण्यास योग्य अशा १·४ ते १·८ कोटी नव्या मजुरांची काम शोधणाऱ्या माणसांत भर पडणार आहे. ह्यांपैकी कमी असलेला आंकडा जरी जमेस धरला तरी २·१ ते २·२ कोटी नवे रोजगार तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत निर्माण करणें अगत्याचें होणार आहे. तरच बेकारी पूर्णपणें नाहींशी होण्याची शक्यता आहे. तथापि, तिसऱ्या कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी जी साधन-सामग्री उपलब्ध आहे तिचा विचार करतां २·२ कोटी रोजगार निर्माण करणें शक्य होणार नाहीं. म्हणून ह्या कालांत काम शोधणाऱ्या माणसांच्या संख्येंत जी नवी भर पडेल तितके रोजगार नव्यानें निर्माण करण्याचें सुचविण्यांत आलें आहे.

ह्याचा अर्थ असा कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस सुद्धां ७५ ते ८० लाख लोकांची बेकारी टाळतां येणार नाहीं. बेकारांची ही संभाव्य संख्या फार मोठी आहे ह्यांत शंका नाहीं. पण ज्या लोकांना अपुरा रोजगार आहे, त्यांची संख्या लक्षांत घेतली तर हें चित्र अधिकच गंभीर दिसूं लागेल. भारताच्या मजूर-मंत्र्यांनीं खेडेगांवांतून व जिल्ह्यांतून रोजगार निर्माण करण्याच्या आवश्यकतेवर भर दिलेला आहे. ह्या दिशेनें करण्यांत येणारे प्रयत्न तसेंच चालू ठेवण्याच्या आवश्यकतेवर भर देऊन अहवाल पुढें म्हणतो कीं, सुशिक्षितांत माजलेल्या तीव्र बेकारीकडे सरकारनें लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. सुशिक्षितामधील बेकारी फार वेगानें वाढत चाललेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शिक्षणाच्या संधी आणि देशांतील अर्थव्यवस्थेच्या गरजा ह्यांच्या संबंधाविषयीं कांहीं उद्दिष्टें ठेवण्यांत आलीं होतीं. ह्या बाबतींत सरकारचें मजूर खातें व शिक्षण खातें ह्यांचें सहकार्य होण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय मजूर खात्यानें योग्य त्या औद्योगिक क्षेत्रांत कामगारांना शिक्षण देण्याच्या आपल्या योजनाहि चालू ठेवल्या पाहिजेत. सरकारला आपल्या निरनिराळ्या खात्यांसाठी नोकर भरावे लागतात. देशांतील उद्योग-विनिमयकेंद्रांतून काम शोधणाऱ्या माणसांची माहिती उपलब्ध असते. सरकारनें आपल्या खात्यांसाठी नोकरांची निवड करतांना उद्योगविनिमय-केंद्रांचा अधिक व्यापक प्रमाणावर उपयोग करून घ्यावा असेंहि सुचविण्यांत आलें आहे. अर्थात्, त्यानें बेकारी निवारण होणार नाहीं.

## हिंदी तंबाखूची ग्रेटब्रिटनमधील आयात
### घट थांबविण्याची आवश्यकता

ग्रेटब्रिटनमध्यें होणाऱ्या हिंदी तंबाखूच्या आयातींत घट झाली आहे. ग्रेटब्रिटननें १९५८ मध्यें १२·४ कोटी रुपयांची हिंदी तंबाखू आयात केली होती; १९५९ मधील आयात १०·८ कोटी रुपयांची झाली. ऱ्होडेशियाकडून अधिकाधिक तंबाखू ग्रेटब्रिटन घेत आहे. ऱ्होडेशियन तंबाखूचा दर्जा अधिक चांगला असतो आणि त्याचा रंग जास्त आकर्षक असतो, त्यामुळें त्या तंबाखूला मागणी वाढत आहे. इतर देशांतील तत्सम दर्जाच्या तंबाखूच्या किंमतीपेक्षा हिंदी तंबाखूची किंमत भारी असते, त्यामुळेंहि हिंदी तंबाखू मागें पडत आहे. बदलत्या आवडीप्रमाणें तंबाखूची प्रत बदलण्यास इतर देश तत्पर आहेत; त्याकारणानें ऱ्होडेशियाच नव्हे तर न्यासालँड, अमेरिका, कॅनडा, इत्यादि देशहि भारताशीं तंबाखूचे बाबतींत स्पर्धा करूं लागले आहेत.

## म्हैसूर बँकेच्या भागीदारांना १०० रु. चे ३६० रु. मिळणार

पूर्वीच्या म्हैसूर बँकेचें स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सबसिडिअरींत रूपांतर होऊन ती १ मार्चपासून 'दि स्टेट बँक ऑफ म्हैसूर' बनली आहे. म्हैसूर बँकेच्या भागीदारांना १०० रुपयांच्या पूर्ण भरणा झालेल्या प्रत्येक भागापोटीं ३६० रुपये नुकसानभरपाई रोखीनें मिळणार आहे. नुकसानभरपाईची एकूण रक्कम १,८०,००,००० रुपये होईल.

## दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.

वरील कंपनीनें १९५९ मध्यें १२,०८,७९४ रु. च्या उत्पादनाची विक्री केली. सर्व खर्च भागवून आणि घसारा, डेव्हलपमेंट रिबेट व कर ह्यांची तरतूद करून निव्वळ नफा ६२,०८६ रु. उरला. भागीदारांना ६% करपात्र डिव्हिडंड मिळणार आहे. अहवालाचे वर्षी कामगारांची वृत्ति सहकार्याची होती; तयार मालाचे भाव सुधारले आणि उत्पादन पूर्वी कोणत्याच वर्षी झालें नव्हतें, एवढें झालें.

## हिंदी पोलादाच्या निर्गतीस प्रारंभ

भारतानें पोलादाच्या निर्गतीस प्रारंभ केला असून, २,००० टन पोलाद विशाखापट्टम बंदरांतून जर्मनीला निघालें आहे. एका जर्मन फर्मनें १२,००० टनांची ऑर्डर दिली आहे, ती पुरी झाली म्हणजे ४० लक्ष रुपये मिळतील.

# BHOR STATE BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1958 Rs. nP. | CAPITAL & LIABILITIES | 31-12-59 Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | 1. Capital | | |
| | *Authorised Capital* - | | |
| 5,00,000—00 | 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| 5,00,000—00 | 2. Issued and Subscribed Capital ... | | 5,00,000—00 |
| | 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | |
| 2,50,000—00 | 3. Called up and paid up Capital ... | | 2,50,000—00 |
| | 10,000 shares of Rs. 50/- each ... | | |
| | Called up and paid up at Rs. 25/- per share ... | | |
| 85,764—87 | 4. Reserve Fund and Other Reserves : ... | | 87,915—23 |
| 49,100—00 | Reserve Fund ... | 50,300—00 | |
| | Investment Fluctuation Fund. | | |
| 3,534—50 | As per Last B/S 3534—50 | | |
| | *Less* : Part amount of loss on Sale of Investments 3534—50 | Nil | |
| 33,130—37 | Reserve for Bad and Doubtful Debts ... | 37,615—23 | |
| 14,31,841—47 | 5. Deposits and Other Accounts | | 14,93,053—99 |
| 5,39,750—00 | Fixed Deposits ... | 5,24,100—00 | |
| 6,64,793—52 | Savings Bank Deposits ... | 7,03,213—21 | |
| 2,27,297—95 | Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 2,65,740—78 | |
| 37,493—28 | 6. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.... | | 46,284—72 |
| 37,493—28 | (i) In India ... | 46,284—72 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | |
| | Particulars | | |
| | (i) Secured against Central and State Govt. and other trustee securities, shown as per contra. ... | | |
| 37,493—28 | | 46,284—72 | |
| Nil | (ii) Unsecured ... | Nil | |
| 11,287—12 | 7. Bills for Collection being Bills Receivable as per Contra : ... | | 11,283—07 |
| 11,287—12 | (i) Payable in India ... | 11,283—07 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | |
| 24,660—86 | 8. Other Liabilities ... | | 27,608—13 |
| 2,643—00 | (i) For Expenses. ... | 3,440—13 | |
| 19,513—34 | (ii) Provident Fund, (Invested as per Contra.) ... | 16,658—75 | |
| 2,504—52 | (iii) Up-paid Dividends. ... | Nil | |
| Nil | (iv) Branch Adjustments. ... | 7,504—25 | |
| Nil | 9. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra : | | Nil |
| 4,979—87 | 10. Profit and Loss Account | | 5,807—58 |
| 8,058—66 | Profit as per last Balance Sheet. | 4,979—87 | |
| 7,900—00 | Less : Appropriations :— | | |
| | Provision for Bad and doubtful debts. 2000/- | | |
| | Reserve Fund. 1200/- | | |
| | Provision for income-tax. 1600/- | 4,800—00 | |
| 158—66 | | 179—87 | |
| 18,41,206—26 | Carried Over Rs. ... | | 19,16,320—01 |

# LIMITED, BHOR.

## AT 31st DECEMBER, 1959

| 31-12-1958 Rs. nP. | PROPERTY & ASSETS | 31-12-1959 Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,43,954—44 | 1. Cash In hand and with the Reserve Bank and State Bank (Including foreign currency notes) ... | | 1,63,412—30 |
| 43,899—05 | 2. Balances with other Banks: (In Current Account and Postal S/B A/C) ... | | 5,124—20 |
| 43,899—05 | (i) In India ... | 5,124—20 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | |
| 50,000—00 | 3. Money at Call and Short Notice ... | | 40,000—00 |
| 8,76,955—37 | 4. Investments at cost ... (Face Value Rs. 8,73,000/-) (Market Value Rs. 8,37,575—80) | | 8,67,967—87 |
| 8,76,310-37 | (i) Securities of the Central and State Government and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. (Of these Securities of the face value of Rs. 17,900-00 are earmarked for Provident Fund as per Contra. Securities of the Face Value of Rs. 6,50,000/- are pledged with Banking Companies for over-draft arrangements). ... | 8,67,322—87 | |
| 645-00 | (ii) Shares. Ordinary Shares Fully paid up of the Face Value of Rs. 600/- Market Value Rs. 600/- | 645—00 | |
| Nil | (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (iv) Other Investments ... | Nil | |
| Nil | (v) Gold ... | Nil | |
| 6,46,893—92 | 5. Advances (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | 7,63,546—68 |
| | (i) Loans, Cash Credits, Overdrafts etc. | | |
| 6,41,893-92 | In India ... | 7,63,546—68 | |
| Nil | Outside India ... | Nil | |
| | (ii) Bills Discounted and Purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | |
| 5,000-00 | (a) Payable in India ... | Nil | |
| Nil | (b) Payable outside India ... | Nil | |
| | **Particulars of Advances** | | |
| 4,36,043-20 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 5,21,527—18 | |
| 1,72,289-26 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' Personal Security. ... | 2,03,203—32 | |
| Nil | (3) Debts considered good and Secured by the Personal Liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors | Nil | |
| 38,561-46 | (4) Debts considered doubtful or Bad, not provided for (Exclusive of Rs. 37,615-33, included in item No. 2, Fully provided for in the Reserve for Bad and Dodbtful Debts as per Contra.) ... | 38,816—18 | |
| 6,46,893-92 | | 7,63,546—68 | |
| Nil | (5) Debts due by the Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with and other persons. ... | Nil | |
| 8,908-75 | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as Members. ... | 8,908—75 | |
| 17,61,702—78 | Carried over Rs. ... | | 18,40,051—05 |

# BHOR STATE BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1958 | CAPITAL & LIABILITIES | 31-12-1959 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| 18,41,206—26 | Brought forward ... | | 19,16,320—01 |
| 4,821-21 | Add :—Net profit for the year ( subject to taxation ) brought from the profit and Loss Account. ... | 5,627—71 | |
| Nil | 11. Contingent Liabilities ... | Nil | |
| 18,46,027—47 | Total Rs. ... | | 19,21,947—72 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31st DECEMBER, 1959.

| 31-12-1958 | EXPENDITURE | 31-12-1959 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| 44,827—62 | 1 Interest paid on deposits, and Borrowings etc. ... | | 50,904—91 |
| 25,272—86 | 2 Salaries and Allowances and Provident Fund :— | | 21,835—90 |
| 3,180—00 | Managing Director, Manager or Chief Executive Officer : ... | 3,055—31 | |
| 22,092—86 | Others. ... | 18,780—59 | |
| 2,011—53 | 3 Directors' and Local Committee Members' Fees and Allowances. ... | | 1,834—00 |
| 3,992—29 | 4 Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 3,826—83 |
| 1,158—97 | 5 Law Charges. ... | | 1,068—84 |
| 957—66 | 6 Postage, Telegram and Stamps ... | | 836—33 |
| 523—73 | 7 Auditors' Fees and Expenses. ... | | 445—00 |
| 1,861—50 | 8 Depreciation on and repairs to Banking Company's Property. ... | | 1,222—58 |
| 1,243—28 | 9 Stationery, Printing, Advertisements etc. ... | | 3,394—30 |
| Nil | 10 Loss from sale or dealing with non-banking assests. ... | | Nil |
| 1,540—62 | 11 Other Expenditure. | | 2,239—11 |
| 66—99 | Bad debts written off ... | 79—40 | |
| 566—72 | Sundry Charges ... | 779—11 | |
| 746—29 | Travelling and Conveyance ... | 1,203—19 | |
| 160—62 | Telephone Charges ... | 177—41 | |
| 4,821—21 | 12 Balance of Profit ( subject to taxation ) transferred to Balance Sheet. ... | | 5,627—71 |
| 88,211—27 | Total Rs. ... | | 93,235—51 |

| 31-12-1958 | INCOME ( Less provision made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | 31-12-1959 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| 82,154—89 | 1. Interest and Discount. ... | | 88,716—78 |
| 2,087—01 | 2. Commission, Exchange and Brokerage :— ... | | 2,198—85 |
| 503—37 | 3. Rent. ... | | 388—00 |
| Nil | 4. Net Profits on sale of Investments, gold and silver, land, premises and other assets ( Not credited to Reserves or to any particular fund or account ). ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets ( Not credited to Reserves or any particular fund or account. ) ... | | Nil |
| Nil | 6. Income from Non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | | Nil |
| 3,466—00 | 7. Other Receipts. | | 2,584—88 |
| 11—00 | Share Transfer fees and splitting fees. ... | 1—00 | |
| 939—00 | Safe Custody charges ... | 825—50 | |
| 33—18 | Sundry receipts ... | 873—36 | |
| 2,482—77 | Supervision charges ... | 885—02 | |
| 0—05 | Gain on conversion (Net) ... | Nil | |
| | | | 93,888—51 |
| Nil | 8. Less:—Loss on sale of investments ... | 4,187—50 | 653—00 |
| | Less:—Adjusted to investment Fluctuation Fund ... | 3,534—50 | |
| 88,211—27 | Total Rs. ... | | 93,235—51 |

B. A. Rajeshirke, *Accountant*

M. V. Shingre, *Chairman.*

N. P. Thopte, *Vice-Chairman*

Y. D. Khole,
B. G. Dhanduke
G. B. Devi } *Directors*

Shri C. R. Rathi, deceased on 25-2-1960.

# LIMITED, BHOR.

## AT 31st DECEMBER, 1959

| 31-12-1958 | PROPERTY & ASSETS | 31-12-1959 | |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| 17,61,702—78 | Brought Forward ... | | 18,40,051—05 |
| Nil | (7) Maximum total Amount of Advances including Temporary Advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | |
| 8,908-75 | (8) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of the private companies, as Members, in the case of item 6 above. ... | 8,908—75 | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| 11,287—12 | 6. **Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | 11,283—07 |
| 11,287-12 | (i) Payable in India ... | 11,283—07 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | |
| Nil | 7. **Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per Contra :** ... | | Nil |
| 22,961—70 | 8. **Premises ( at cost less Depreciation )** | | 22,389—70 |
| 26,910-86 | As per last Balance Sheet ( at cost ) ... | 26,910—86 | |
| 3,949-16 | Less Depreciation written off. ... | 4,521—16 | |
| 8,794—54 | 9. **Furniture and Fixtures, ( At cost Less Depreciation )** | | 8,413—54 |
| 23,689-57 | As per last Balance Sheet ( at cost ) ... | 23,689—57 | |
| Nil | Add : Additions during the Year. ... | 269—58 | |
| | | 23,959—15 | |
| 14,895-03 | Less : Depreciation written off. ... | 15,545—61 | |
| 41,281—33 | 10. **Other Assets Including Silver** | | 39,810—36 |
| 7,086-78 | ( i ) Interest accrued but not received. ... | 6,031—37 | |
| 1,500-00 | ( ii ) Stock of Printing and Stationery on hand ( as valued and certified by the Accountant.) ... | 1,932—00 | |
| 3-07 | ( iii ) Interest due but not collected. ... | 8—00 | |
| 6,130-06 | ( iv ) Sundry Debtors. ( Rs. 1193-30 being considered Doubtful and not provided for ) ... | 3,815—65 | |
| 23,661-75 | ( v ) Income Tax paid at source ... | 27,779—51 | |
| 2,528-17 | ( vi ) Branch Adjustment A/C. ... | Nil | |
| 371-50 | ( vii ) Safe Custody Charges. ... | 243—83 | |
| Nil | 11. **Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | Nil |
| Nil | 12. **Profit and Loss Account.** ... | | Nil |
| 18,46,027—47 | Total Rs. ... | | 19,21,947—72 |

### REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Bhor State Bank Limited, as at 31st December, 1959 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated unaudited returns from all the Branches in India not visited by us for the purpose of this report.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of sections 211 and 227 of Companies Act, 1956, the Balance-Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act, 1956; they are, therefore, drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) the transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) in our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books; (d) the Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account (e) in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Cmpanies Act, 1956, in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1959, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended up to that date.

Poona 27th Feb. 1960.　　**GADRE & BHIDE**, Chartered Accountants.

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR

## SIXTEENTH ANNUAL REPORT OF THE DIRECTORS

*Gentlemen,*

Your Board of Directors has great pleassure to submit to you the report together with Audited Balance Sheet and Profit and Loss Account of the Bank for the year ended on 31st December 1959.

The transactions during year the under report resulted in a net Profit of Rs. 5627-71 Adding to this Rs. 179-87 nP. being the balance brought forward from the last year's account, the amount available for distribution is Rs. 5807—58. Your Directors recommend to distribute this amount as under :—

| | |
|---|---|
| 1. To tranfers to Reserve Fund ... | 1,200—00 |
| 2. To provide for Income Tax ... | 3,400—00 |
| 3. To provide for Bad and Doubtful debts ... | 1,100—00 |
| 4. To carry forward to the next year's account ... | 107—58 |
| Total Rs. ... | 5,807—58 |

Your Board after careful consideration has decided not to declare any dividend this year.

Advisory Committees at Bhor, Pali and Shirval are rendering useful services in the conduct of the business. Your Board is thankful to all the members of the Local Advisory Committees and other Government Officials for their co-operation. Your Board of Directors wishers to say that after the merger of States several difficulties had to be faced in the process of recovery due to various laws, but inspite of all these difficulties, it is being recovered satisfactorily.

Your Board is glad to state that the constituents are taking the best advantage of our Safe Deposit Vault and safe custody at Bhor. Various constituents are getting advantage of Godown facilities at Bhor, Pali and Shirwal.

The Directors report with deep regret the sad and sudden demise on 25-2-1960 of their esteemed collegue Shri. Chandanmal Rampratap Rathi who was a director of our Bank from 30-3-1947. He was an asset to the Bank as a Director. The Board notes with a deep sense of gratitude that the unstincted great efforts and valuable guidance of Shri Rathi accounts for the prosperous development of our Shirwal Branch. He was a man of high business integrity and of wide ripe experience. The Directors also regret to have to report the sad and untimely death on 4-2-1960, of Shri Shankarrao Nanasaheb Karpe an ex-Director of our Bank. The Directors desire to place on record their high appreciation of the valuable services rendered by Shri C. R. Rathi and Shri S. N. Karpe to the Bank.

Shri N. P. Thopte retires under Article 115 of the Articles or Association read with regulation 78 and Table A of the Indian Companies Act. He is eligible to and offers himself for re-election.

Director Raosaheb Y. D. Khole, and Legal adviser Shri. G. P. Parkhi, B. A., LL. B. Advocate are always giving benefit of their experience with their valuable services in all important matters referred to them for which your Board is much thankful to them.

As mentioned in the last report your Board of Directors is still under correspondence with the State Bank of India for amalgamation of our Bank with them and their reply is awaited.

Your Board places on record the appreciation for the work done by the staff.

You are requested to appoint Auditors for the next year and to fix their remuneration.

For self and on behalf of the Board

28th Feb. 1960.

M. V. Shingre
*Chairman.*

**भद्रावती येथील कारखान्याचा विस्तार** — म्हैसूर राज्यांतील भद्रावती आयर्न अँड स्टील वर्क्स ह्या कारखान्याचा विस्तार करण्याचें काम एका जर्मन कंपनीकडे देण्यांत आलें आहे. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर कारखान्यांतील पोलादाचें उत्पादन १ लाख टनांनीं वाढेल. विस्तारयोजनेंतील वाढतें उत्पादन १९६२ सालापासून होऊं लागेल.

**ओतकामाची भट्टी** — चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांत एका मोठ्या ओतकामाच्या भट्टीच्या प्राथमिक तयारीला आरंभ झाला आहे. ह्या भट्टीसाठी ४ कोटी रुपये खर्च येईल. तीमधून प्रथम दरसाल ७,००० टन वजनाचा माल तयार होईल. पण तिच्या विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर दरसाल १०,००० टन माल तयार होऊं शकेल.

**तिसऱ्या वर्गाची झोंपण्याची सोय**—पुढील वर्षाच्या मध्यापासून तिसऱ्या वर्गानें ५०० मैलांपेक्षा अधिक प्रवास करणाऱ्या प्रवाशांची झोंपण्याची सोय अधिक चांगली करण्यांत येणार आहे. लांब प्रवास करणाऱ्या प्रत्येक गाडीला झोंपण्याची सोय असलेला निदान एक तरी तिसऱ्या वर्गाचा खास डबा जोडण्यांत येणार आहे.

**गोदावरी नदीवरील पूल**—आंध्र प्रदेशांत भद्राचलम् ह्या ठिकाणीं गोदावरी नदीवर एक मोठा पूल बांधण्यांत येत आहे. भद्राचलम् ह्या ठिकाणीं प्रभु रामचंद्रांनीं आपल्या वनवासांतील कांहीं काळ घालविला होता, असे म्हणतात. भद्राचलम्ला येणाऱ्या यात्रेकरूंची पुलामुळें मोठी सोय होणार आहे. पुलासाठी ६,५०,००० रुपये खर्च येणार आहे.

**अंधांच्या मदतीसाठी कार्यक्रम**—अमेरिकेमधील अंधांना मदत देण्याच्या हेतूनें न्यूयॉर्क येथें भारतामधील विविध प्रकारच्या पोशाखांचें प्रदर्शन भरविलें जाणार आहे. निरनिराळ्या तऱ्हेचे पोशाख घालून भारतीय स्त्री-पुरुषच त्यांचे प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. हा कार्यक्रम अमेरिकेंतील भारताच्या वकिलातीमधील नोकरांच्या पत्नींनीं व मुलींनीं आखला आहे.

**हुबळी येथें रेल्वे इस्पितळ**—दक्षिण रेल्वेतर्फे हुबळी येथें रेल्वेच्या नोकरवर्गासाठी एक इस्पितळ उभारण्यांत येत आहे. इस्पितळासाठी ११ लाख रु. खर्च येणार असून त्यांत ८५ रोग्यांची सोय होणार आहे. इस्पितळांत दोन शस्त्रक्रियागृहेंहि बांधण्यांत येणार आहेत.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.